# मजीप्राने सुरू केला पाचवा पंप, पाणीपुरवठा सुरळीत

## दररोज भरल्या जातात २५ टाक्या | एक दिवसाआड पूर्ण दबावाने होतो पाणीपुरवठा

**खासदार बळवंत वानखडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत निर्णय**





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) –** अमरावती व परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने (मजीप्रा) १० जूनपासून पाचवा पंप सुरू केला आहे. त्यामुळे आता दररोज शहरातील २५ पाणी टाक्या भरल्या जात असून, एक लाख १२ हजार ग्राहकांना एक दिवसाआड पूर्ण दबावाने पाणीपुरवठा केला जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शहरातील अनेक भागांमध्ये कमी दाबाने किंवा अनियमित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. नागरिकांचे पाणीबिल येत असूनही नळाला पाणी येत नसल्याने अनेकांनी बिलांची थकबाकी ठेवली होती. यासोबतच, सिभोरा धरणातून येणा?्या पाईपलाईनचे जुनेपण आणि वारंवार होणारे गळती यामुळे समस्या अधिकच गंभीर झाली होती.

ही बाब लक्षात घेता नुकत्याच खासदार बळवंत वानखडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर पाचव्या पंपाच्या सहाय्याने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रारंभी १० जून रोजी याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. तथापि, जुन्या पाईपलाईनमुळे लिकेज होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अशा वेळी सहकार्य करावे, असे आवाहन उपअभियंता संजय लेव्हलकर यांनी केले आहे.

### दररोज १५० दलघमी पाणीपुरवठा

सध्या मजीप्रा दररोज १५० दलघमी पाणीपुरवठा करत असून, पाचही पंप कार्यरत असल्यामुळे टाक्या भरल्या जात आहेत आणि पाणी योग्य दबावाने ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. यामुळे कृत्रिम टंचाई टळणार असून, नागरिकांना एक दिवसाआड नियमित आणि समाधानकारक पाणी मिळणार असल्याचा दावा मजीप्राच्या वतीने करण्यात आला आहे.

# पोहरा पूर्णा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर

## प्रामाणिक अधिकाऱ्याला होणाऱ्या त्रासाविरोधात कारवाईची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**खोलापूर, (दि. १८) –** भातकुली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पोहरा पूर्णा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी वानखडे यांना लेखी निवेदन देत ग्रामविकास अधिकारी युवराज जाधव यांच्याविरुद्ध होत असलेल्या खोट्या प्रचाराच्या निषेधार्थ कारवाईची मागणी केली आहे.

पोहरा पूर्णा ही लहान ग्रामपंचायत असून अल्प उत्पन्नामुळे गावाच्या विकासात अनेक अडचणी निर्माण होत होत्या. सन २०२१ मध्ये युवराज जाधव यांनी ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यापासून ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यांनी ग्रामस्थ आणि पदाधिका?्यांना विश्वासात घेऊन संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, ग्रामपंचायतीस आयएसओ प्रमाणपत्र, दाखले ऑनलाईन सुविधा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, आरो प्लांट, तसेच पंतप्रधान आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली.

जाधव यांना काही गावांचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला होता, तरीही त्यांनी आपल्या कार्यक्षमतेने जबाबदारी पार पाडली. मात्र, काही राजकीय व्यक्तींनी अपप्रचार करत त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे गावकऱ्यांत संतापाची भावना असून, खोटी माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध चौकशी करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी वस्तुस्थिती समोर आणावी, असेही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर युवा सरपंच गजानन लांजेवार, उपसरपंच नंदकिशोर बोरकर, सदस्य देवराव शेंडे, सौ. सविताताई बोबडे, सौ. वनिता लांजेवार आदींच्या सह्या असून, त्यांनी गटविकास अधिकारी वानखडे यांच्याकडे हे निवेदन सादर केले.

# १२वी आणि नीट परीक्षेत वैभवीची उत्तुंग झेप




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) :** डॉ. पंजाबराव देशमुख बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या वतीने आयोजित अभिनंदन व मार्गदर्शन सोहळ्यात वैभवीचा देशमुखचा गौरव करण्यात आला. वैभवीने बारावी परीक्षेत आणि नीट परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले. मेधावी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावच्या सरपंच स्व. संतोष अण्णा देशमुख यांच्या कन्या वैभवी देशमुख या विशेष आकर्षण ठरल्या.

कार्यक्रमात माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या हस्ते वैभवीचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी वैभवीने आपल्या भावना मांडताना उपस्थित विद्यार्थ्यांना संदेश दिला की, कोणताही संघर्ष आपल्याला पुढे जाण्यापासून थांबवू शकत नाही. तिने मागील काही महिन्यांतील स्वतःचे अनुभव अत्यंत भावनिक स्वरूपात सांगितले. तिच्या प्रत्येक शब्दाने सभागृहात एक विलक्षण शांतता पसरली. उपस्थितांची मने हेलावून गेली. तिच्या अनुभवातून हे प्रकर्षाने जाणवले की, एखाद्या कठीण प्रसंगातून सावरलेले तरुण मन किती खोल व्यथित असते.

# एमडी ड्रग्ज प्रकरणात माहिती दिल्याच्या संशयावरून युवकावर हल्ला

## दोघांना अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) :** शहरात एमडी ड्रग्जसंबंधी पोलिसांना माहिती दिल्याच्या संशयावरून एका युवकावर पाच जणांनी प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना अलीमनगर भागात शुक्रवारी रात्री घडली. लोखंडी पाईपने झालेल्या हल्ल्यात शहेजाद खान गैस खान (वय ३०, रा. बडनेरा) गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नागपुरी गेट पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

शहेजाद खानच्या तक्रारीनुसार, काही महिन्यांपूर्वी त्याने बडनेरा परिसरातील एमडी ड्रग्ज विक्रीबाबत पोलिसांना माहिती दिली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापेमारी करत ड्रग्ज जप्त केले होते. याच रागातून अलीमनगर येथे शुक्रवारी रात्री शेख मुदस्सीर (५५), शेख मुजम्मील (२८), मोहम्मद मुदस्सीर (२५), शेख पप्पा (४०) आणि अजहर शेख अहमद या पाच जणांनी त्याच्यावर लोखंडी पाईपने हल्ला केला, असा आरोप आहे. जखमी अवस्थेतील शहेजादला शेजारील अहमद यांनी ऑटोतून पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर त्याच्यावर उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागपुरी गेट पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंदवून शेख मुदस्सीर व शेख मुजम्मील या दोघांना अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

### शेख मुजम्मीलची प्रत्युत्तर तक्रार : शहेजादवरही गुन्हा

दरम्यान, याच प्रकरणात शेख मुजम्मील शेख अहमद यानेही पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, शहेजाद खान उर्फ भुरु गौस याने विनाकारण शिविगाळ केली. त्याचा भाऊ बबलूने मुजम्मीलच्या भावाला काठीने मारहाण केली. त्यानंतर शहेजादने चाकूने हल्ला करत मोहम्मद मुत्तब्बीर याला जखमी केले, असा आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी शहेजाद खान आणि बबलू या दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल केला आहे.

# घरकामगार दिन उत्साहात ; महिलांनी मांडल्या मागण्या

## श्रमसाफल्य घरेलू कामगार संघटनेचा उपक्रम





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८)** श्रमसाफल्य घरेलू कामगार संघटनेच्या वतीने जागतिक घरकामगार दिवसाचे औचित्य साधून राहुल नगर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने घरकामगार महिला उपस्थित होत्या. केक कापून आणि पुष्प देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून शितल वाघमारे उपस्थित होत्या. त्यांनी घरकामगारांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली तसेच त्या योजनांची अंमलबजावणी जलद गतीने व्हावी यासाठी महिलांनी एकत्र येऊन शासनाला आव्हान देण्याची गरज असल्याचे सांगितले. नीलिमा भटकर यांनी कायदेविषयक माहिती देताना, घरकामगार महिलांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहण्याचे महत्त्व सांगितले. तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या समुपदेशक प्रीती मून यांनी घरकाम करताना आरोग्याच्या बाबतीत होणाऱ्या समस्यांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाग्यश्री खडेकार होत्या. त्यांनी आपल्या भाषणात, घरकाम हेही काम आहे आणि घरकाम करणारी महिला ही कामगार आहेङ्क हे अधोरेखित करत सरकारकडे काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. त्यामध्ये घरकामगारांची त्वरित नोंदणी, तालुका पातळीवर यंत्रणा स्थापन करणे, त्रिपक्षीय मंडळात संघटनांचा समावेश, अपघाती विमा योजना, मुलांसाठी शिष्यवृत्ती, किमान वेतन, आजारपणाची आणि आठवड्याची सुट्टी लागू करणे आदी मागण्या होत्या. तसेच, ङ्कवेतन, बोनस आणि पेन्शन मिळवण्यासाठी घरकामगार महिलांनी संघटित होऊन संघर्ष करावा असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन ईश्वरी तायवाडे यांनी तर आभार प्रदर्शन शुभांगी वरघट यांनी केले. यावेळी जोशना वानखडे, सुजाता तायडे, राणी बनोदे, पल्लवी खंडारे, सुनिता धाकडे, छाया टेंभुर्णे, गीता धरमपल्ली आदी उपस्थित होत्या. जागतिक अर्थव्यवस्थेत घरकामगार महिलांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांचा सन्मान व हक्क सुनिश्चित करणे काळाची गरज असल्याचे या कार्यक्रमातून ठसवण्यात आले.

# वायगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे भव्य आयोजन

## मान्यवरांच्या उपस्थितीत अधोरेखित होणार योगाचे महत्त्व

**महासागर प्रतिनिधी**
**टाकरखेडा संभू (दि. १८) –** दरवर्षीप्रमाणे महर्षी वाल्मिकी योग साधना केंद्र, वायगाव यांच्या वतीने २१ जून शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सकाळी १० ते ११ या वेळेत होणा?्या या विशेष कार्यक्रमात योगाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर होणारे फायदे प्रत्यक्ष कृतीतून मांडले जाणार आहेत.

कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद राव लहाळे, प्रख्यात रसायनशास्त्रज्ञ म्हस्के, समाजसेवक विशाल जाधव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रसिद्ध व्याख्याते व कीर्तनकार ह.भ.प. चंद्रशेखर महाराज कराळे, राजेंद्र मस्के सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी ,आयुर्वेदाचार्य डॉ. संदीप इंगोले, तसेच आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक पं. योगेश पवार हे या कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन योग व व्यसनमुक्ती प्रचारक अशोक डोंगरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, योगाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैली आणि व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने वाटचाल करण्याचा संदेश दिला जाणार आहे. सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमात वायगाव येथे उपस्थित राहून योग दिन साजरा करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. योग दिनाच्या निमित्ताने सामूहिक योगाभ्यास, जागृतीपर भाषणे व आरोग्यदायी जीवनाचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

### तालुका पालक अधिकाऱ्यांकडून आज पहिला आढावा

**अमरावती :** तालुकास्तरावरील समस्या आणि यंत्रणांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सात तालुका पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या सात अधिकाऱ्यांनी आज पहिला तालुका दौरा आपल्या क्षेत्रात केला.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत

## तुर, कपाशी व सोयाबीन पेरणीसाठी शेतीची तयारी पूर्ण



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) –** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी पेरणीपूर्व मशागत पूर्ण केली असून आता पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू आहे. शेतांमध्ये जांभूळ वाई करून रोटावेटर व ट्रॅक्टरच्या साह्याने बेड तयार करण्यात आले असून तुर लागवडीसाठी शेतजमीन पूर्णपणे तयार झाली आहे. कपाशी साठीही सऱ्या तयार असून पाऊस पडताच तुर, कपाशी आणि सोयाबीनची पेरणी तत्काळ केली जाणार आहे.

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे तुरीचे मोठे नुकसान झाल्याने यंदा शेतकऱ्यांनी नवीन पद्धतीने बेडवर तुर लागवड करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे अतिवृष्टी झाली तरी पिकाचे नुकसान होणार नाही, असा विश्वास त्यांना आहे.

दरम्यान, मागील वर्षीच्या सोयाबीनच्या कमी दरामुळे काही शेतकऱ्यांनी यंदा कपाशीच्या लागवडीकडे कल दर्शविला आहे. मात्र कपाशीमध्ये खुरपणीचा खर्च अधिक असल्याने अनेक शेतकरी राउंडअप सहनशील बीटी कपाशीला प्राधान्य देत आहेत. ही बियाणे शासनमान्य नसल्याने ती बाजारात बेकायदेशीरपणे विकली जात असून शेतकरी अधिक पैसे देऊन ही बियाणे खरेदी करत आहेत व चोरट्या पद्धतीने लागवड करत आहेत. अजित-५ या लवकर येणाऱ्या कपाशी वाणालाही शेतकऱ्यांकडून पसंती मिळत आहे. मात्र या बियाण्याचा तुटवडा असल्याने बाजारात चढ्ढ पेक्षा जास्त दराने विक्री होत असून काळाबाजारही सुरू झाला आहे. लवकर येणा?्या कपाशीला शेतक?्यांचा अधिक कल असल्याचे कारण म्हणजे उशिरा येणाऱ्या कपाशीवर बोंड अळीचा धोका वाढतो. सध्या शेतकरी तयारीच्या अंतिम टप्प्यात असून, वेळेवर पावसाळा सुरू झाल्यास तालुक्यात चांगले उत्पादन घेता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महावितरणकडून स्मार्ट टीओडी मीटर बसवण्यास आला वेग!

## जिल्ह्यात आतापर्यंत ६० हजार मीटर बसवले | मोबाईलवर मिळणार थेट रीडिंग



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८)** महावितरणकडून संपूर्ण राज्यात 'टीओडी प्रकारचे आधुनिक स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू असून, अमरावती जिल्ह्यात आतापर्यंत तब्बल ६० हजार स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. या नवीन तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना आता मोबाईलवर थेट रीडिंग पाहता येणार असून, वीज वापरावर नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होणार आहे.

**काय आहे टीओडी मीटरचे वैशिष्ट्य?**

महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावानुसार, ग्राहकाने वीज कधी वापरली त्यानुसार दर आकारले जातील. उदाहरणार्थ, वीज वापर कमी असलेल्या कालावधीत (ऑफ पीक अवर्स) दर कमी, तर जास्त वापराच्या वेळेत (पीक अवर्स) दर अधिक असेल. ही सवलत फक्त टीओडी मीटर वापरणा?्यांनाच मिळणार आहे.

**प्रथम अपार्टमेंट, नंतर घरगुती ग्राहक**

सध्या शहरातील अपार्टमेंट्समध्ये हे स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू असून, पुढील टप्प्यात घरगुती ग्राहकांकडेही मीटर बसवले जाणार आहेत. हे मीटर सध्या पोस्टपेड स्वरूपाचे असून, दरमहा बिल भरण्याची विद्यमान पद्धत यापुढेही कायम राहणार आहे.

**मोबाईलवर अचूक माहिती**

ग्राहकांकडून कोणतेही शुल्क न आकारता हे स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसवले जात आहेत. या मीटरच्या माध्यमातून वीज वापराची अचूक मोजणी होणार असून, ग्राहकांना रिअल टाईम डेटा मोबाईलवर पाहता येईल. त्यामुळे कर्मचा?्यांना रीडिंगसाठी घरी बोलावण्याची गरजच उरणार नाही.

**प्रतिकूलता असूनही काम सुरूच**

राज्यात काही ठिकाणी या स्मार्ट मीटरला विरोधही झाला होता. तरीदेखील महावितरणने हे काम न थांबवता खासगी कंपनीच्या माध्यमातून मीटर बसवण्याची प्रक्रिया सुरू ठेवली आहे.

**ग्राहकांचा आग्रह नाही**

सध्या या मीटर बसवण्यासाठी ग्राहकांची जबरदस्ती केली जात नाही. कोणी नकार दिल्यास महावितरणकडून कोणताही आग्रह केला जात नसल्याची माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली.

> ग्राहकांना स्मार्ट मीटरमधून अचूक रीडिंग आणि मोबाईलवर नियंत्रण मिळणार.
>
> **अशोक साळुंके, मुख्य अभियंता, महावितरण**

# गुणवंत विद्यार्थ्यांचा हैद्राबाद अभ्यास दौरा

## विद्यार्थ्यांचा विमानाने प्रवास; पंचतारांकित सुविधा उपलब्ध




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.१८) –** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावतीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी एक अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन औद्योगिक व सामाजिक वास्तवाचा अनुभव मिळावा, या हेतूने १९ ते २२ जून या कालावधीत इन्स्टिट्यूट स्पॉन्सर्ड डोमेस्टिक स्टडी टूअर चे आयोजन करण्यात आले आहे. हा अभ्यास दौरा अमरावती ते हैदराबाद असा असणार असून, विद्यार्थ्यांचा प्रवास विमानाने होणार आहे. तसेच, निवासाची पंचतारांकित सुविधा कॉलेजतर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या विशेष अभ्यास सहलीसाठी केवळ उच्च शैक्षणिक गुणवत्तेसह नियमित उपस्थिती असलेल्या ३७ निवडक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या दौ?्यात विद्यार्थ्यांना हैदराबाद येथील नामांकित औषधनिर्माण व औद्योगिक संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय, रामोजी फिल्म सिटीसह ऐतिहासिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या स्थळांना भेट दिली जाणार आहे.

अभ्यास दौऱ्याचे प्रमुख समन्वयक प्रा. अभिजीत वेलंकीवार व प्रा. दीप्ती बोंडे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण नियोजन व आवश्यक मार्गदर्शन दिले आहे. प्राचार्य डॉ. दीप्ती रुईकर यांच्या सहकार्याने व संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

# नवजात अर्भक जीवंत असल्याच्या शंकेवरून डफरीनमध्ये गोंधळ

## नातेवाईकांचा रुग्णालय प्रशासनावर हलगर्जीपणाचा आरोप




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि. १८) :** जिल्हा सामान्य रुग्णालयात मंगळवारी २० आठवड्याची गर्भवती असलेल्या एका महिलेचा गर्भपात करण्यात आला. महिलेच्या गर्भातून तीन मृत अर्भकांना बाहेर काढण्यात आले होते. परंतू दफनविधीवेळी एक नवजात अर्भक जीवंत असल्याची शंका नातेवाईकांना आली आणि नातेवाईक अर्भकाला घेऊन जिल्हा स्त्री रुग्णालयात पोहोचले. यावेळी नातेवाईकांनी डॉक्टरांवर हलगर्जीपणाचा आरोप केल्याने गोंधळ उडाला. डॉक्टरांनी अर्भकाला निरीक्षणात ठेवले असून, या घटनेच्या अनुषंगाने रुग्णालयात प्रशासनाकडून चौकशी सुरु करण्यात आली आहे.

रुग्णालयातील सुत्रानुसार, जिल्हा स्त्री रुग्णालयात २१ वर्षीय महिलेच्या प्रसुतीचा उपचार सुरु होता. परंतू महिला २० आठवड्याची गर्भवती होती आणि तिच्या पोटात तीळे बाळ होते. त्यामुळे डॉक्टरांनी महिलेला गर्भपात करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार मंगळवारी रात्री गर्भपात करण्यात आला. त्यावेळी तीन्ही बाळ हे मृत असल्याचे रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर नातेवाइकांच्या हाती मृतदेह देण्यात आले. दु:खद मन:स्थितीत नातेवाइकांनी तात्काळ त्या बाळांना अंतिम संस्कारासाठी नेले. परंतू काही वेळाने एका मृत बाळाच्या हालचालींबाबत संशय निर्माण झाल्याने नातेवाइक परत रुग्णालयात धावले. त्यामुळे प्रचंड गोंधळ उडाला. या प्रकरणात वैद्यकीय दुर्लक्ष झाले असल्याचा आरोप करत नातेवाइकांनी रुग्णालय प्रशासनाकडे तक्रार दाखल केली. डॉक्टर व संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

> २० आठवड्याची गर्भवती महिला होती. तिच्या पोटात तिन बाळ होते. त्यामुळे महिलेचा गर्भपात करण्यात आला. यामध्ये ३०० ग्रॅम वजनाचे ते बाळ होते. तीन्ही बाळ हे मृतावस्थेत होते. मृत बाळांना नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. परंतू त्यानंतर नातेवाईक मृत बाळाला घेऊन पुन्हा रुग्णालयात परतले आणि ते बाळ जीवंत असल्याचा संशय व्यक्त केला. त्यामुळे बाळाला निरीक्षणात ठेवण्यात आले आहे. यापूर्वीही महिलेचा दोन वेळा गर्भपात झालेला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल. वैद्यकीय अहवाल आणि उपस्थित कर्मचाऱ्यांच्या जबाबावर आधारित पुढील निर्णय घेतला जाईल.
>
> **विनोद पवार,**
> **वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय.**

> जिल्हा स्त्रि रुग्णालयातील घटनेविषयी पोलिस यंत्रणेपर्यंत अद्यापपर्यंत आलेली नाही. माहिती आल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.
>
> **अतुल वर,**
> **पोलिस निरीक्षक, गाडगेनगर ठाणे.**

# जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेची छापेमारी

## ६ आरोपींना अटक, सुमारे ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) :** नागपूरीगेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत अकबरनगर परिसरात एका टिनशेडमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट क्र. १ ने छापा टाकत सहा जुगार खेळणा?यांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत सुमारे ४९९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठ अधिका?यांच्या आदेशानुसार शहरातील विविध भागात अवैध धंद्यांवर कारवाई सुरू केली आहे. त्याच दरम्यान गुप्त माहितीनुसार, अकबरनगर येथील पुलाजवळील टिनशेडमध्ये काही इसम ५२ पत्त्यांचा हारजीतीचा खेळ खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने तत्काळ छापा टाकत सहा इसमांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जुबेर शहा रऊफ शहा (२७, रा. गुलजारनगर), वहीद खान खलिल खान (३२, रा. गुलजारनगर), अरशद खान रहेमत खान (३२, रा. अकबरनगर), शेख अन्वर शेख शमी (३५, रा. अकबरनगर), शेख अझर शेख कमरुद्दीन (१९), साबीर शहा हसन शहा (५५, दोन्ही रा. गुलजारनगर) यांचा समावेश आहे. या छाप्यात १३३९० रुपये रोख रक्कम, ५२ पत्त्यांचा कॅट, तीन मोबाईल हॅंडसेट (किंमत अंदाजे ३६५०० रुपये) असा एकूण ४९,९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर जुगार खेळण्यासाठी वापरली गेलेली जागा ही जुबेर शहा रऊफ शहा याच्या मालकीची असल्याचे उघड झाले आहे. अटक आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी नागपूरीगेट पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकार, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व सहायक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईसाठी पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, पो.उपनि. प्रकाश झोपाटे, तसेच पथकातील पोलीस कर्मचारी सतीष देशमुख, फिरोज खान, प्रशांत मोहोड, अलीमुद्दीन खतीब, नाझीमुद्दीन सय्यद, विकास गुढधे, रणजित गावंडे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखील गेडाम व चालक अशोक खंगार, किशोर खेंगरे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# खानापूर पांढरीत माजी सरपंच महिलेच्या घरासमोर तिन्ही गाड्यांना आग




**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, (दि. १८)–** खानापूर पांढरी येथील माजी महिला सरपंच उज्वला ताई दीपक पाटील यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या तीन गाड्यांना मध्यरात्री अज्ञात इसमाने पेटवून दिल्याने संपूर्ण गावात खळबळ उडाली आहे. ही घटना १७ जूनच्या मध्यरात्रीनंतर सुमारे अडीच वाजता घडली. घरासमोर उभ्या असलेल्या चारचाकी नॅनो (MH29 AD1570), स्कुटी (MH27 DX7872) आणि फॅशन प्रो (MH27 DN0563) या तिन्ही गाड्यांना आग लावण्यात आली. आग आणि धुरामुळे दीपक पाटील यांच्या कुटुंबातील सदस्य जागे झाले, मात्र तोपर्यंत तिन्ही वाहने पूर्णपणे जळून खाक झाली होती. गावाच्या मुख्य रस्त्यावर असलेल्या पाटील कुटुंबाच्या घरासमोरच हा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेनंतर दीपक पाटील यांनी आजूबाजूच्या परिसरात संशयितांचा शोध घेतला, परंतु कुणीही दिसून आले नाही. याबाबत अंजनगाव सुजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस तपास सुरू आहे.

> ‘माझ्या घरासमोरील तिन्ही गाड्या पेट्रोल टाकून जाळण्यात आल्या. यामुळे माझ्या घरालाही आग लागण्याची शक्यता होती. अचानक घडलेल्या या घटनेमुळे मी व माझे कुटुंब अत्यंत घाबरून गेलो होतो. ही घटना कोणी केली हे अद्याप समजलेले नाही. मी रात्रीच पोलिसांना घटनेची माहिती दिली आहे.’
>
> **दीपक पाटील, (जय लक्ष्मी ट्रान्सपोर्ट, पांढरी)**

# त्वरित पंचनामे करुन तत्काळ अहवाल सादर करण्याचे

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १८) :** जिल्ह्याचे सर्व साधारण क्षेत्र १२.२१ लाख असून लागवडी लायक क्षेत्र ७.८१ लाख हे. आहे. खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र ६.९१ लाख हे. व रब्बी पिकाचे सरासरी क्षेत्र १.४७ लाख हे. आहे. जिल्ह्यातील खरीपाची मुख्य पिके सोयाबिन, कापूस, तूर असून रब्बीतील मुख्य पिके हरबरा व गहू आहेत. जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची संख्या १४, एकूण गावांची संख्या २०१६ असून २०२१ च्या कृषि गणनेनुसार एकूण शेतकरी संख्या ४ लाख ५६ हजार ३६० आहे. त्या पैकी १ हे. पेक्षा कमी क्षेत्र असलेल्या शेतक–यांची संख्या ३६ टक्के, १ ते २ हे. क्षेत्र असलेल्या शेतक–यांची संख्या ४३ टक्के, २ हे. पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची संख्या २१ टक्के आहे. जिल्ह्यातील सरासरी जमिन धारणा १.६४ हे. आहे.जिल्ह्याचे माहे जून महिन्याचे सरासरी पर्जन्यमान १४५.७ मि.मी असून दि. १६ जून २०२५ पर्यत प्रत्यक्षात ४४.४ मि.मी. पाऊस झाला आहे. पावसाची टक्केवारी ३०.५ टक्के आहे. जिल्ह्यात माहे एप्रिल २०२५ व मे २०२५ या कालावधित नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेती, फळ पिकांच्या नुकसानीसाठी ४७.०५ कोटी रुपये शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे. माहे जून महिण्यात दि. १ जून ते दि. १५ जून २०२५ या कालावधीत वादळी वा?यामुळे जिल्ह्यातील ९४ गावातील ९३३.४३ हेक्टर क्षेत्रावर शेती पिके, फळपिकाचे नुकसानीबाबत तालुका कृषि अधिकारी अंजनगाव, धारणी, चांदूरबाजार, चिखलदरा, मोशी व दर्यापूर यांनी प्राथमिक अहवाल सादर केलेला असून या बाधित क्षेत्राचे पंचनामे सुरु आहेत. बाधित क्षेत्राचे त्वरित पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कृषी व महसूल विभागाला दिले आहे.



## सलोना येथे जनजागृती, लाभ वितरण

**अमरावती :** केंद्र सरकारच्या ’धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान’ आणि ’प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान’ अंतर्गत आदिवासी व आदिम जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यात विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. योजनांच्या माहितीसाठी महिती, शिक्षण आणि संवाद मोहिम राबविण्यात येत आहे. यानुसार सलोना, ता. चिखलदरा येथे जनजागृती आणि लाभ वितरण शिबीर आज पार पडले.



# ग्राम पंचायत कार्यालय वलगांव ता.जि. अमरावती

## निविदा सुचना क्र. १ सन २०२४/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय वलगांव पंचायत समिती अमरावती जि. अमरावती यांचे मार्फत १५ वा वित्त आयोग योजना मधुन खालील प्रमाणे कामाच्या मोहरबंद निविदा ब–१ टक्केवारी प्रपत्रामध्ये जि.प. अमरावती यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव, ग्रामपंचायत कार्यालय वलगांव ता.जि. अमरावती कडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित प्राकलन किंमत रू. | बयाना रक्कम (१ टक्के) रू | काम करण्याचा कालावधी | निविदा प्रसिद्धीचा वेळ | पंजीबद्धा कंत्राटदाराचे वर्गीकरण | कोऱ्या निविदेची किंमत | कोऱ्या निविदा मिळण्यासाठी अर्ज करण्याचा दिनांक व वेळ | भरलेल्या निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ | निविदा उपस्थिता समक्ष उघडणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अहिल्याबाई होळकर स्मारक दुरुस्ती करणे | २,२६,६२८/- | २२६६/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | दि. १८.६.२०२५ ते दि. २६.६.२०२५ वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत | दि. ३०.६.२०२५ वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत | मासिक सभेतून |
| २ | कॉंक्रिट रस्ता | ४३,२८६/- | ४३२ /- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ३ | मदिना मस्जीद सौंदर्यीकरण | २,००,०००/- | २०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ४ | सि.सि. रस्ता वार्ड क्र. ४ | ३,००,०००/- | ३०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ५ | सि.सि. नाली वार्ड क्र. ३ | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ६ | वार्ड क्र. १ ते ६ रपटा नाली | २,००,०००/- | २०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ७ | सि.सि. रस्ता वार्ड क्र. १ | २,५०,०००/- | २५००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ८ | सि.सि. रस्ता वार्ड क्र. ६ | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ९ | सि.सि. नाली वार्ड क्र. ५ | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| १० | सि.सि. नाली वार्ड क्र. ४ | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| ११ | सि.सि. नाली वार्ड क्र. २ | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| १२ | सि.सि. रस्ता वार्ड क्र. ४ | ७,५०,०००/- | ७५००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| १३ | सि.सि. नाली वार्ड क्र. २ | ६,११,६३४/- | ६११६/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |
| १४ | ओपन जिम | ४,००,०००/- | ४०००/- | ६ महिने | पहिली | वर्ग ७ व त्यावरील | ५००/- | | | |

टिप :-

१. निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय वलगांव पंचायत समिती अमरावती जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२. निविदा ह्या दोन लिफाफे पद्धातीने सादर करावयाच्या आहेत.
३. निविदा स्विकारणयाचे तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.
४. दि. २६/०६ /२०२५ ला सायंकाळी ५.३० वाजेनंतर कोऱ्या निविदा दिल्या जाणार नाही.
५. दि. ३०/०६/२०२५ ला सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आलेल्या निविदा स्विकारल्या जातील व त्या ग्रामपंचायत मासिक सभेमध्ये उघडण्यात येईल.
६. तरतुदी पेक्षा जास्त खर्च करता येणार नाही.
७. निविदा स्विकारण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांचेकडे राहील.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय, वलगांव**
**ता.जि. अमरावती**



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अवैध वाळू-मुरूम उत्खननावर धामणगाव तहसीलदारांचा घणाघात!

## सलग चौथ्या कारवाईने तस्करांचे धाबे दणाणले | तहसीलदार अभय घोरपडे ऑन फायर

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे (दि. १८) –** धामणगाव रेल्वे तालुक्यात बिनधास्तपणे सुरू असलेल्या अवैध वाळू व मुरूम उत्खननावर तहसीलदार अभय घोरपडे यांनी सडेतोड कारवाया करत कठोर पवित्रा घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील भरारी पथकाने अवघ्या आठ दिवसांत सलग चार मोठ्या कारवाया करत अवैध गौण खनिज वाहतूक करणा?्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवायांमुळे उत्खनन माफियांमध्ये खळबळ उडाली असून, प्रशासनाचा धाक निर्माण झाला आहे.

**पहिली कारवाई – दि. १२ जून, तळेगाव दशासर**

सायंकाळी ५.३० वाजता तळेगाव दशासर येथील आठवडी बाजाराजवळ भरारी पथकाने ट्रॅक्टर (MH 29 AK 1320) पकडला. ट्रॅक्टर चालक आनंद सुरजुसे (रा. राळेगाव दशासर) याच्याकडे कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे आढळून आले. बेंबळा नदी पात्रातून अंदाजे १ ब्रास रेती





अवैधरित्या काढून वाहतूक केली जात होती. यावर पंचनामा करून ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला.

**दुसरी व तिसरी कारवाई – दि. १५ जून, मंगरूळ दस्तगीर चौफुली, जुना धामणगाव रोड**

सकाळी ५.१५ वाजता ट्रॅक्टर (MH 27 DL 4579) मुरूम वाहतूक करताना पकडण्यात आला. चालक सुधीर महादेव शिळम (रा. जुना धामणगाव) याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे आढळले. हा ट्रॅक्टर राहुल गावंडे यांच्या मालकीचा असून, यामध्ये १ ब्रास मुरूम होता. ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला व ट्रॉली (MH 27 DL 4579) पकडण्यात आली. चालक व ट्रॅक्टर मालक यांच्यावर कारवाई झाली. यामध्येही हे मुरूम मौजा जुना धामणगाव येथील बाल्या धुर्वे यांच्या शेतातून आणले असल्याचे तपासात समोर आले.

**चौथी कारवाई – दि. १८ जून, तळेगाव दशासर**

सकाळी ११.४५ वाजता तळेगाव दशासर येथील आठवडी बाजाराजवळ भरारी पथकाने ट्रॅक्टर (MH 32 P 2015) पकडला. चालक सतीश जवंजाळ (रा. तळेगाव दशासर) याच्याकडेही रेती वाहतुकीचा परवाना नव्हता. ट्रॅक्टरमध्ये १ ब्रास रेती आढळून आली असून ती बेंबळा नदी पात्रातून अवैधरित्या काढण्यात आली होती. पंचनामा करून ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला. या कारवाईत तालुका पालक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अमरावती प्रसन्नजीत चव्हाण, तहसीलदार अभय घोरपडे, ग्राम महसूल अधिकारी सागर भांडवले, गौरव श्रीराव, ताटेश्वर पाटील यांची उपस्थिती होती.

### मागील कारवाईत तस्करांनी ट्रक पळवून नेला

११ जून रोजी बोरगाव गोकुळसरा घाटात भरारी पथकाने एक पिकअप ट्रक पकडला होता, परंतु तहसील कार्यालयात आणत असताना तस्करांनी ट्रक पळवून नेला. या प्रकरणी ट्रक मालकाविरोधात भारतीय दंड संहिता कलम १२६, ३२१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तहसीलदारांचा इशारा – अवैध उत्खनन थांबवा अन्यथा कठोर कारवाई होणार!

या सलग आणि धडक कारवायांमुळे तहसीलदार अभय घोरपडे यांचे नाव तालुकाभर गाजत असून, त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'तालुक्यातील कोणतेही अवैध गौण खनिज उत्खनन खपवून घेतले जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणा?्यांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल. प्रशासन सजग आहे आणि कायदा हातात घेणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही.'

### लोकप्रतिनिधींनी व नागरीकांनीही केले भरारी पथकाचे कौतुक

या सर्व कारवायांमध्ये मंडळ अधिकारी राजेश लाड, संगीता धारणे, महसूल अधिकारी विजय गाते, सागर भांडवले, प्रकाश चव्हाण, आकाश चव्हाण, गौरव श्रीराव यांचे विशेष सहकार्य लाभले. तहसीलदार आणि त्यांच्या टीमच्या धाडसी कार्यप्रणालीचे गावागावातील नागरीक आणि सामाजिक संस्थांकडून कौतुक होत आहे.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात तीन महिन्यांच्या रेशन वाटपाला सुरुवात

## पूरबाधित गावांना प्राधान्य, ३० जूनपर्यंतच लाभ घेण्याचे आवाहन





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती–** पावसाळ्याची चाहूल लागताच नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. पुरवठा विभागाने जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे रेशन एकत्रितपणे जून महिन्यातच वाटप करण्यास सुरुवात केली आहे. ही योजना विशेषतः पूरप्रवण गावांना लक्षात घेऊन राबवण्यात येत आहे.

तालुक्यातील १५६ पैकी ३० ते ३५ गावे दरवषी पुराच्या संकटाचा सामना करतात. अशा वेळी रस्ते बंद होणे, संपर्क तुटणे आणि नागरिकांचे स्थलांतर ही संकटे उद्भवतात. यामुळे पूराच्या काळात अन्नधान्याचा तुटवडा होऊ नये म्हणून शासनाच्या निर्देशानुसार तीन महिन्यांचे रेशन आगाऊ वितरित केले जात आहे.

### बैठकीत महत्त्वाचे निर्णय

तालुका पुरवठा कार्यालयात नुकतीच एक बैठक पार पडली. यामध्ये अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना वेळेत रेशन देण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर आधार लिंकिंग, ई-केवायसी व मोबाईल नंबर सीडिंगसाठी विशेष मोहीम राबवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

**शितल राठोड,**
**पुरवठा निरीक्षण अधिकारी, नांदगाव खंडेश्वर**

**पूरबाधित गावांना प्राधान्य**

या योजनेंतर्गत सर्वप्रथम पूरप्रवण गावांमध्ये रेशन पोहोचवण्याचे काम वेगात सुरू आहे. काही गावांमध्ये रेशन पोहोचले असून, काही ठिकाणी वाटप सुरू झाले आहे. या निर्णयामुळे आपत्तीच्या वेळी होणारी घाईगडबड आणि अडचणी टळणार आहेत.

**३० जून ही अंतिम तारीख**

पुरवठा विभागाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, लाभार्थ्यांनी आपले तीन महिन्यांचे रेशन ३० जूनच्या आत घ्यावे. यानंतर रेशन दिले जाणार नाही.

त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत रेशन घेऊन पुढील आपत्तीपासून स्वतःची आणि कुटुंबाची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्या महिला परिषदेतर्फे मातोश्री कमल गवई यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. १८) :** वयाच्या ८३ व्या वर्षीही विविध कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग, तसेच इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होणा?्या मातोश्री कमल गवई यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. जेसीआयच्या मातोश्री झाल्यानंतर डॉ. गोविंद कासट मित्रमंडळाच्या सत्कारानंतर, गुजराती समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक धीरूभाई सांगाणी यांनी त्यांचा सत्कार स्वतःच्या घरी व्हावा अशी इच्छा व्यक्त केली होती.

या अनुषंगाने त्यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या कार्यक्रमात अहिल्या महिला परिषद अध्यक्षा जयश्री शाहकार, पद्मा फुटाणे, प्रतीक्षा उमेकर,



नीता टेकाळे व दमयंती उमेकर यांच्या हस्ते पुस्तक प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी काशिनाथ फुटाणे, सुधाकर उमेकर, सुदर्शन गांग, डॉ. गोविंद कासट उपस्थित होते. कार्यक्रमास गुजराती समाज, जलाराम सत्संग मंडळ, सार्वजनिक वाचनालय, नांदगाव पेठ मित्रमंडळी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ये बाई... पाणी फेकू नको!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. १८) :** अगं बाई, नळ आलाय म्हणून कालचं पाणी फेकतेस? पिण्याचं पाणी कधीच शिळं होत नाही! अशी सामाजिक जाणीव जागवणारी प्रेरणादायी संकल्पनेला कृषी महाविद्यालय बोडणाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली आणि थेट विदर्भ पाणी परिषदेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. घराघरात दिसणाऱ्या चुकीच्या पाण्याच्या सवयींवर प्रकाश टाकत, जलसंवर्धना बाबत जागृती निर्माण करणारी ही संकल्पना नागपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या तीन दिवसीय परिषदेत सादर करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन वनामती सभागृह, धरमपेठ येथे करण्यात आले होते. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय, बोडणा येथील



- विद्यार्थांच्या जलसंवर्धन संकल्पनेला द्वितीय क्रमांक
- विदर्भ पाणी परिषदेमध्ये संकल्पनेचे झाले कौतुक

### जलसंवर्धनाची ही चळवळ प्रत्येक घरात पोहोचविण्याची गरज

परिषदेमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या अध्यक्षा तथा माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ङ्गजलसंवर्धनाची ही चळवळ प्रत्येक घर, गाव व शहरात पोहचणे गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या व औद्योगिकीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे पाणी जपून वापरणे काळाची गरज आहे.

प्राचार्य डॉ. संजय देशमुख व कार्यक्रम अधिकारी प्रा. स्वाती देशमुख यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी पाण्याच्या वापराबाबत सखोल विचार करत समाजातील वास्तव चित्रण एक सशक्त चित्रफीतीतून सादर केले. विद्यार्थ्यांमध्ये दिव्या भागात, अनुजा नितनवरे, सायली वानखेडे, नंदिनी कामदी, खुशी भंडारे, अनुराग जैस्वाल, साईराज जाधव, ओम इंगोले, अमन मालधुरे, शंतनू देशमुख, भावना चौधरी, नंदिनी जवारकर, प्रांजली राठोड, रक्षिता भोळे यांनी अभिनयाच्या माध्यमातून जल संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

### ही संकल्पना नव्या जलसंवर्धन चळवळीचा प्रारंभ


विद्यार्थ्यांनी साकारलेली संकल्पना ही नव्या जलसंवर्धन चळवळीचा प्रारंभ ठरेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. संजय देशमुख यांनी व्यक्त केला. तसेच अतिशय कमी वेळेत प्रभावी चित्रफीत सादर करून विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधनाचं कार्य केलं. त्यांचा प्रयत्न आणि त्यातून मिळालेलं यश हे खरोखरच प्रेरणादायी आहे, असे मार्गदर्शक प्रा. स्वाती देशमुख यांनी सांगितले. पाणी हे अमूल्य आहे आणि त्याचा शाश्वत वापर म्हणजेच उज्ज्वल भविष्याची हमी! कृषी महाविद्यालय बोडणाच्या विद्यार्थ्यांनी समाजाला पाण्याची किंमत काय असते हे त्यांच्या प्रतिभाशाली सादरीकरणातून समजावून सांगितले.

# शेंदूरजना बाजार येथे घराला आग; संसारोपयोगी साहित्य खाक

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि. १८) :** तालुक्यातील शेंदूरजना बाजार येथे रविवारी सकाळच्या सुमारास हिंमतराव डोमाजी घुरडे यांच्या घराला अचानक भीषण आग लागली. या आगीत संपूर्ण घरातील संसारोपयोगी साहित्य, कपडे, धान्य, शालेय साहित्य व महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली असून, संबंधित कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या घटनेत हिंमतराव डोमाजी घुरडे यांचे घर पूर्णतः जळून गेले. सकाळी घरातील सर्व सदस्य काही कामानिमित्त बाहेर गेले असताना ही दुर्घटना घडली. अचानक घरातून धुराचे लोट दिसू लागल्याने शेजा?्यांनी धाव घेतली आणि पाण्याच्या साहाय्याने आग आटोक्यात



आणण्याचा प्रयत्न केला.

घटनेचे संभाव्य कारण म्हणजे देवपाटाजवळ ठेवलेली दिव्याची जळती वात उंदराने ओढून नेल्याने आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र कुटुंबाला मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने मदतीचे पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# एसटी बसच्या धडकेत युवक ठार, दोघे जखमी

## ब्राह्मणवाडा थडीजवळ रात्रीची दुर्घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार (दि. १८) :** शिरजगावकडे जाणाऱ्या एसटी बसने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एका युवकाचा जागीच मृत्यू झाला असून, दुचाकीवरील अन्य दोन युवक गंभीर जखमी झाले. ही दुर्घटना शनिवारी, १४ जून रोजी रात्री ब्राह्मणवाडा थडी येथे घडली.

मृत युवकाचे नाव अरुण राजू उईके असून, तो दुचाकीने जात असताना ब्राह्मणवाडा थडी येथील निचत यांच्या घरासमोर एसटी बसने (क्र. चक४०.वाय.५२२९) दिलेल्या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीवरील अन्य दोन युवक, सर्व रा. बेलकुंड (जि. खंडवा, मध्यप्रदेश) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातास कारणीभूत ठरलेल्या एसटी बसचा चालक अरुण नारायण पावसे (वय ३८) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार उल्हास राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल राऊत व हेमंत येरखळे करीत आहेत.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी सेवा उपलब्ध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. १८) :** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व अनुसंधान केंद्र, अमरावती येथे सर्वच प्रकारच्या आरोग्य सोयीसुविधा उपलब्ध आहेत. त्यामध्ये गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागात आता प्रगत तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या अनुभवासह आरोग्य सेवा उपलब्ध झालेल्या आहेत. ज्या अमरावती आणि परिसरातील रुग्णांसाठी उपयुक्त ठरणार आहेत.

हाय डेफिनेशन गॅस्ट्रोस्कोपी अथवा कोलोनोस्कोपी व्हिडीओ सिस्टमव्दारे विविध पचनतंत्राशी



संबधित विकारांचे अचूक निदान व उपचार आता डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय, मोशी रोड, अमरावती येथे शक्य झाले आहे. त्यामध्ये प्रमुख सेवा म्हणजे अपचन व पोटदुखीचे परीक्षण व उपचार, वरच्या पचनमार्गातील रक्तस्त्रावाचे तातडीचे व नियोजित व्यवस्थापन, जीआय ट्रॅकमधून बायोप्सी करून कर्करोग व संसर्गाचे लवकर निदान, डायग्नॉस्टीक व थेरप्युटीक कोलोनोस्कोपी या सेवा गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अमित डफळे व गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. राम ग?ट्टानी देणार आहेत.

या आरोग्य नविन सुविधा डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालय येथे गरजू रुग्णांना दर्जेदार व पुराव्याधिष्ठित उपचार देण्याचा उद्देश साधतात, ज्यामुळे रुग्णाला मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही, रूग्णांनी मेडिसीन ओपीडी क्रमांक ०३ येथे संपर्क साधावा किंवा रुग्णालय व्यवस्थापक डॉ. श्रीकांत फुटाणे यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ९७३०७५३०६४ यावर संपर्क साधता येईल. डॉ. अमित डफळे व डॉ.राम गट्टानी हे रुग्णालयामध्ये प्रत्येक मंगळवार, बुधवार व गुरूवार या दिवशी सकाळी ९ ते दु. १२ वाजेपर्यंत उपलब्ध असतील. पात्र शस्त्रक्रिया व उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध असतील. या आरोग्य सुविधेचा गरजू व गरीब रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख तसेच महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांनी केले आहे.

# विजय ग्रंथ महापारायणाने भक्तिरसात न्हालं आसेगाव पूर्णा

- सुरेखा ठाकरे यांच्या संकल्पनेतून पार पडला भक्तिमय सोहळा
- हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा संभु ( दि. १८) –** आसेगाव पूर्णा येथे श्रीसंत गजानन महाराज विजय ग्रंथाच्या महापारायणाचा एक भव्य आणि भक्तिपरायण सोहळा आयोजित करण्यात आला. सुरेखा ठाकरे यांच्या संकल्पनेतून निखिल ठाकरे मित्रपरिवार आणि गजानन महाराज सेवेकरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात परिसरातील हजारो भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारायणाच्या माध्यमातून संपूर्ण गावात भक्तिरसाचे आणि पावित्र्याचे वातावरण निर्माण झाले.


आसेगाव पूर्णा येथे श्रीसंत गजानन महाराज विजय ग्रंथाच्या महापारायणाचा एक भव्य आणि भक्तिमय सोहळा मोठ्या श्रद्धेने पार पडला. या दिव्य कार्याचे आयोजन सुरेखा ठाकरे यांच्या संकल्पनेतून, निखिल ठाकरे मित्रपरिवार आणि गजानन महाराज सेवेकरी यांच्या वतीने करण्यात आले होते. या सोहळ्यात आसेगाव पूर्णा परिसरातील सुमारे पंधराशेहून अधिक महिला व भक्तगण सहभागी झाले होते. व्यासपीठावर शितल पुंड, शारदा भागवतकर, वृषभ चुंभळे यांनीही मुखोद्गत पारायण केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, दिलीप पाटील धोंडे, प्रकाश पाटील ठाकरे यांची उपस्थिती होती. मंच सेवेकरी म्हणून प्रमोद कराळे गुरुजी, विजय गणवीर, सौरभ दिवाण, श्रेयस वैध, सुनिता मानकर यांनी सेवा बजावली. महापारायण यशस्वी करण्यासाठी सुषमा बर्वे, आशाताई गोटे, संगीता साबळे, शारदा करडे, प्रणिता उपाशे, अर्चना बोबडे, शालिनी भोरे, रंजना भुजाडे, मीनाक्षी बोबडे, ज्योती वैद्य, सुचिता चिथोरे, उषा मोहोड, वनिता इंगळे, अनिता सुळे, रंजना पाथरे यांच्यासह अनेक सेवेकरी महिला कार्यरत होत्या. तसेच शिवा फुलझले, राहुल डवरे, पंकज वैराळे, सुरज काटोलकर, रोशन लेंडे, सचिन भुयार, प्रवीण ठाकरे, वैभव बर्व, गजेंद्र फुके, सचिन वाटाणे, शिवशंकर घुरडे, तेजस भुजबळ, आशिष अब्रूक, योगेश ठाकरे, संदीप मोहोड, अमोल इंगळे, दीपक ठाकरे, अतुल वैद्य, निलेश पुसतकर, नयन वैद्य, सतीश गोरखेडे, गिरीश बंड, व निखिल ठाकरे मित्रपरिवार यांनीही संयोजनासाठी मोलाचे योगदान दिले.या पवित्र महापारायणाने आसेगाव पूर्णा गावात भक्तिरसाचे अनोखे वातावरण निर्माण केले होते.

### विशेष आकर्षण ठरली मुखोद्गत बाल पारायणकार सुरभी ढगे

या महापारायणाचे विशेष आकर्षण ठरली मुखोद्गत बाल पारायणकार सुरभी भाग्यश्री सुनील ढगे, वय वर्षे ९, रा. चिंचवड, पुणे. केवळ सातव्या वर्षीच तिने यूट्यूबवर विद्या पडवळ यांचे पारायण ऐकून संपूर्ण विजय ग्रंथ मुखोद्गत केला. तिच्या सुमधुर वाणीने संपूर्ण पारायण पूर्ण झाल्याने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

# पौराणिक आख्यायिका आणि ऐतिहासिक वास्तू यांचा संगम

## पांडव कचेरीचा अज्ञात इतिहास | घनदाट जंगलात पुरातत्व खात्यानं जपलेला ऐतिहासिक वारसा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, दि. १८ :** सातपुडा पर्वतरांगांच्या सान्निध्यात, घनदाट जंगलाच्या कुशीत वसलेली एक ऐतिहासिक वास्तू 'पांडव कचेरी' आजही अनेक आख्यायिका आणि पुरातत्त्वीय रहस्यं अंगी बाळगून आहे. अमरावती जिल्ह्यातील मोशी तालुक्यापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर, मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यात माडू नदीच्या पलीकडे वसलेलं हे ठिकाण 'पांडव कचेरी' म्हणून ओळखलं जातं.

उत्तर-दक्षिण दिशेला असलेली ही आयताकृती वास्तू पूर्णतः लालसर दगडात बांधलेली आहे. ३२ खांबांवर उभी असलेली ही इमारत देखणी कोरीव चौकट, लाकडासारखी भासणारी शिल्पकला आणि सुंदर प्रवेशद्वार यामुळे भाव खाऊन जाते. आतमध्ये एका गाभा?्यासारखा भाग असून दोन अनोळखी मूर्ती सध्या तेथे विराजमान आहेत. मूळ महादेवाची पिंड असलेलं स्थान मात्र सध्या भग्नावस्थेत आहे. या वास्तूतील दगडी बाकांवरून पूर्वी येथे कारकून वा अधिकारी बसत असावेत, असा अंदाज आहे. खांबांवर आकर्षक नक्षीकाम असून काही ठिकाणी स्त्री-पुरुषांच्या प्रतिकृती दिसून येतात. गाभा?्याच्या दालनाचं सुंदर दार आणि उंबरठा देखील लक्ष वेधून घेतो. मात्र या इमारतीवर मंदिरांसारखा कळस नाही, म्हणूनच ती एक सभा किंवा दरबार असावा, अशीही शंका उपस्थित होते. या इमारतीभोवती दगडी परकोट बांधलेला असून त्याची रुंदी इतकी आहे की त्यावरून ट्रक जाऊ शकतो. परकोटाच्या आतमध्ये काही भग्न मूर्ती, नागफण्यासारखी कलाकृती आणि सिंहासनासारखे अवशेष दिसतात. एका कलाकृतीला भगवा रंग लावलेला असून स्थानिक आदिवासी त्याची पूजा करतात, असेही सांगितले जाते.

### पौराणिक आख्यायिका आणि गोंड राजांचं जुना इतिहास

या स्थळाशी अनेक पौराणिक आख्यायिका जोडल्या गेलेल्या आहेत. अज्ञातवासात असताना पांडवांनी या भागात वास्तव्य केल्याची आख्यायिका प्रचलित आहे. चिखलद?्याजवळील वैराट हे पांडवांचे वास्तव्यस्थान मानले जाते. याशिवाय, पांडव कचेरीस गोंड राजांची कचेरी मानलं जातं. इथे न्यायनिवाडा, कर वसुली अशी कामं केली जात असत, असा स्थानिकांचा विश्वास आहे. या भागातील सालबडी परिसर सातवाहनकालीन वास्तूंसाठी प्रसिद्ध आहे. महादेवाची गुफा, लेण्या आणि ही इमारत या सगळ्यांचा अभ्यास करता ही कचेरी सातवाहन काळातील असावी, असा अंदाज पुरातत्त्व अभ्यासक डॉ. जयंत वडतकर यांनी व्यक्त केला. संपूर्ण परिसर हा ऐतिहासिक व धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असल्याचं ते ठामपणे सांगतात.

### सांस्कृतिक वारसा जपण्याची गरज

सध्या भारतीय पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात असलेली ही वास्तू जरी सुरक्षित असली तरीही तिला अधिक व्यापक स्वरूपात संवर्धित करून पर्यटनदृष्ट्या विकसित करण्याची गरज आहे. पांडव कचेरी म्हणजे केवळ एक वास्तू नव्हे, तर इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचा ठसा असलेलं एक अति महत्त्वाचं ठिकाण आहे.

